# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 20 August 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – २० ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०

****

- देशभरातले डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडून राष्ट्रीय कृती दलाची स्थापना
- बदलापूर इथं आदर्श महाविद्यालयात दोन विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचाराचा प्रकार उघड- मुख्याध्यापिका निलंबित तर दोन सेविका बडतर्फ-प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश
- शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी हिंगोली इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचं आंदोलन

आणि

- परळी वैजनाथ इथं उद्यापासून पाचदिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन

****

देशभरातले डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली आहे. या शीघ्र कृती दलात १४ सदस्यांचा समावेश असणार आहे. कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयानं स्वत: दखल घेत, आज त्यावर सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठाने सदर कृती दलाला तीन आठवड्यात हंगामी अहवाल आणि दोन महिन्यात अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

पीडित तरुणीचं नाव आणि छायाचित्र सार्वजनिक झाल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं चिंता व्यक्त केली. या प्रकरणी प्रथम माहिती अहवाल–एफआयआर उशीरानं का दाखल करण्यात आला, असा प्रश्नही न्यायालयानं उपस्थित केला. या प्रकरणात सीबीआयनं केलेल्या तपासाचा अहवाल २२ ऑगस्ट पर्यंत सादर करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. तपासात राहिलेल्या त्रुटीबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. हत्येला आत्महत्या ठरवण्याचा प्रयत्न केला गेला, एफआयआरमध्ये हत्येचा उल्लेख केला गेला नाही, याबद्दल न्यायालयाने वैद्यकीय महाविद्यालय प्रशासन आणि पोलिसांना जाब विचारला आहे. याबाबतची पुढील सुनावणी येत्या २२ ऑगस्टला होणार आहे.

****

दरम्यान, सर्व केंद्र सरकारी रुग्णालयांमध्ये सुरक्षा व्यवस्थेत २५ टक्क्यांनी वाढ करण्यास केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे. या घटनेनंतर राज्यातल्या निवासी डॉक्टरांच्या बेमुदत संपाचा आज आठवा दिवस आहे. सर्व सरकारी वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयं 'सुरक्षित झोन' घोषित करावीत आणि केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायदा लागू करावा, या मागणीवर निवासी डॉक्टर ठाम आहेत. आरएमएल रुग्णालयाच्या निवासी डॉक्टर असोसिएशन, आरडीएने त्यांचा संप मागे घेतला आहे. इतर वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांच्या निवासी डॉक्टर संघटनेनेही संप मागे घेण्याची अपेक्षा आरडीएनं व्यक्त केली आहे.

****

ठाणे जिल्ह्यात बदलापूर मधील आदर्श महाविद्यालयात दोन विद्यार्थिनीच्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर संतप्त पालकांनी आज सकाळी बदलापूर रेल्वे स्थानकात सकाळी सुरु केलेलं रेल रोको आंदोलन अद्यापही सुरु आहे. या आंदोलना दरम्यान, पोलिसांनी सौम्यबळाचा वापर केला, त्यावेळी आंदोलकांनी दगडफेक केल्यानं आंदोलनाला हिंसक वळण लागलं. यापूर्वी पालकांनी आदर्श महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळही आंदोलन केलं.

दरम्यान, या प्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापिकेला निलंबित करण्यात आलं असून मुलांची जबाबदारी असलेल्या दोन सेविकांना सेवेतून कमी करण्यात आलं आहे. तसंच संस्थाचालकांविरुध्द कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. तसंच याप्रकरणी संबंधित पोलीस निरीक्षकांची देखील तत्काळ बदली करण्यात आली आहे.

****

दरम्यान, या प्रकरणी आरोपीला कडक शासन करण्यात येईल, असं सांगत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवण्याचे निर्देश दिले. अशा प्रकरणात प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला. सखी शाळांमध्ये सावित्री समित्या स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची चौकशी करण्यासाठी पोलिस महानिरीक्षक दर्जाच्या वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक एसआयटी गठित करण्याचे आदेश दिले आहेत. तसंच सदर खटला जलदगती न्यायालयात चालवण्यासाठी प्रस्ताव आजच दाखल करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले आहेत.

****

राज्यातील सर्व शाळांमध्ये विशाखा समिती स्थापन करणं बंधनकारक करण्याचे आदेश आजच जारी करण्यात येणार असल्याचं, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितलं. बदलापूर इथली अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर, मंत्रालयात शिक्षण विभागाची तातडीची बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना मंत्री केसरकर यांनी ही माहिती दिली. शाळांमध्ये सखी सावित्री समितीचे काम सुरू करण्याचे आदेश दिले होते. मात्र, शाळांमध्ये या समित्या स्थापन झाल्या नसतील तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल तसंच मुलींच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी ई बॉक्ससोबतच तक्रार पेटी बंधनकारक केली जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

राज्यात शक्ती कायदा आणण्यासाठी आमच्या सरकारच्या काळात मसुदा तयार केला, तो या सरकारनं मंजूर करून शक्ती कायदा तयार करावा असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. बदलापूर अत्याचार प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर ते आज मुंबईत माध्यमांशी बोलत होते. या घटनेतील आरोपींना कडक शिक्षा व्हायला हवी तसंच हा खटला जलद चालवून तत्काळ आरोपीवर कारवाई झाली पाहिजे असं ते यावेळी म्हणाले.

****

बदलापूर घटनेतील गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. राज्यात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. सरकार लाडक्या बहिणींच्या लेकींच्या सुरक्षेसाठी काय करत आहे असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशाव्दारे विचारला आहे.

****

केंद्रीय लोकसेवा आयोगाने जाहीर केलेली विविध पदांवरची समांतर भरतीची जाहिरात मागे घेतली आहे. ही जाहिरात रद्द करावी अशी सूचना, केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष प्रीती सुदन यांना केली आहे. २०१४ पूर्वी अनेक पदांवर अशाच प्रकारे भरती करण्यात आली होती. मात्र, समांतर पदभरतीत आरक्षणाची तरतूद नाही. त्यामुळे लोकसेवा आयोगानं ही जाहिरात रद्द करावी, असं जितेंद्रसिंह यांनी म्हटलं होतं.

****

हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आज हिंगोली इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे आंदोलन करण्यात आलं. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, पीक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित जमा करावा, पीक कर्ज वाटप करावं, सोयाबीनला सात हजार तर कापसाला पंधरा हजार रुपये हमीभाव द्यावा या आणि इतर मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना या मागण्यांचे निवेदन देण्यात आलं.

****

बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं उद्यापासून पाचदिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवात कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, कृषी विद्यापीठ दालन, परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री केंद्र, आधुनिक कृषी अवजारं प्रदर्शन, स्वंयसहाय्यता महिला बचत गट निर्मित वस्तू पदार्थांचे विक्री तसंच प्रदर्शन असे विविध प्रकारचे स्वतंत्र दालन आयोजित करण्यात आली आहेत. नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आलं आहे.

****

ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावं, या प्रमुख मागणीसाठी जालना इथल्या गांधीचमन चौकात आमरण उपोषणाला बसलेले दीपक रणनवरे यांची आज माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी भेट घेतली. समाजाच्या मागण्यांबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन चर्चा करू, असं आश्वासन दानवे यांनी रणनवरे यांना यावेळी दिलं. रणनवरे यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. ब्राह्मण समाजबांधव यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या वतीने आज मिशन कॉम्पिटेटिव्ह या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेणाऱ्या इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी कशा पध्दतीने करावी, या विषयावर या कार्यशाळेत भर देण्यात आला. या उपक्रमात शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक तसंच शिक्षक यांनी सहभागी व्हावं, असं आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांनी केलं आहे

****

महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य समिती–एमआरएस या नव्या पक्षाची स्थापना करणार असल्याची घोषणा, भारत राष्ट्र समिती बीआरएसचे महाराष्ट्र प्रमुख शंकर धोंडगे यांनी केली आहे. बीआरएसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आज नांदेड इथं घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीत नांदेडमध्ये येत्या ५ सप्टेंबरला एमआरएसचे अधिवेशन घेण्याचा ठरावही घेण्यात आला.

****

धाराशिव तालुक्यात भिकारसारोळा या गावात आढळलेला रुग्ण हा पोलिओचा रुग्ण नसल्याचं, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर हरिदास यांनी स्पष्ट केलं आहे. चालू वर्षी जुलै अखेरपर्यंत असे १३ रुग्ण आढळून आले, परंतु तपासणीअंती त्यापैकी कोणीही पोलिओ संसर्गबाधित आढळलं नाही, त्यामुळे नागरिकांनी या रुग्णाबाबत संभ्रम बाळगण्याची आवश्यकता नाही, असं डॉक्टर हरिदास यांनी सांगितलं.

****